महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

दूरध्वनी क्र.०२२-२२८५०४७१ Email ID directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./कावि/आवास प्लस/PMAY-G-२/७६८२/२०२१ दिनांक -०२/०३/२०२१

प्रति,
कार्यकारी अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- ज्या लाभार्थ्यांना यापूर्वी घरकुले मंजूर झालेली आहेत व त्यांची नावे आवास प्लस मध्ये आहेत त्यांची नावे वगळण्याबाबत.**

**संदर्भ :- मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. २६ फेब्रुवारी, २०२१ मधील व्हिडिओ कॉन्फरन्सींगमधील निर्देश.**

संदर्भीय व्हिडिओ कॉन्फरन्सींगमध्ये मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी आवास प्लस मधील अपात्र लाभार्थ्यांना वगळण्याची कार्यवाही १५ मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत, सदरची कार्यवाही करताना खाली नमूद बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजने अंतर्गत लाभार्थी निवड ही सामाजिक, आर्थिक व जात सर्व्हेक्षण (SECC - २०११) नुसार तयार् करण्यात आलेल्या जनरेटेड प्रायोरिटी लिस्ट ग्रामसभेपुढे ठेवून, ग्रामसभेच्या मान्यतेने प्राप्त झालेल्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमधून केली आहे व या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमधून लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. तसेच प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांची नावे जनरेटेड प्रायोरिटी लिस्ट मध्ये समाविष्ट नव्हती, त्यांचेसाठी स्वतंत्र "ड" यादी ग्रामसभेमध्ये मान्यता घेऊन करण्यात आली. सदर "ड" यादीतील लाभार्थ्यांची सप्टेंबर २०१८ ते मार्च २०१९ या कालावधी दरम्यान आवास प्लसमध्ये नोंदणी करण्यात आली.

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजने अंतर्गत प्राप्त उद्दिष्ट, मंजूरी खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र | योजना | उद्दिष्ट | मंजूरी |
|---|---|---|---|
| १ | प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण | ११,९५,३९० | ९,७७,२२३ |
| २ | रमाई आवास योजना | ३,३५,७३३ | ३,०५,४२२ |
| ३ | शबरी आवास योजना | ८३,२९५ | ८०,१७३ |
| ४ | आदिम आवास योजना | ७,००६ | ५,७४४ |
| ५ | पारधी आवास योजना | ४,१८१ | ३,९०४ |
| ६ | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (२०१९-२०२०) | ५४६ | ३५७ |
| ७ | अटल बांधकाम कामगार योजना – ग्रामीण (२०१८-२०१९) | ९७,९९९ | ४९ |

प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण अंतर्गत कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीतील लाभार्थी व राज्य पुरस्कृत योजनेचे लाभार्थी त्यांची नावे "प्रपत्र ड / आवास प्लस" मध्ये समाविष्ट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दि. ०३/०२/२०२१ ते ०५/०२/२०२१ या कालावधीत राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या क्षेत्रीय भेटी दरम्यान असे निदर्शनास आले की, प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण व राज्य योजने अंतर्गत कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमधून ज्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला आहे, त्यापैकी काही लाभार्थ्यांची नावे पुन्हा "प्रपत्र ड / आवास प्लस" यादीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

तरी, अशा लाभार्थ्यांची नावे आवास प्लस मधून दि. १५ मार्च, २०२१ पर्यंत वगळण्यात यावेत व तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. राजाराम दिघे)

**संचालक**

**राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

**महाराष्ट्र राज्य**

**प्रत**:- १) मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.

३) उपआयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीस्तव.

४) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.